सीबीएसई,आयसीएसई,आयबी,आयजीसीएसई,
सीआयई इत्यादी देशातील व विदेशातील मंडळांच्या
अभ्यासक्रमाशी संलग्नित होणा-या इंग्रजी
माध्यमांच्या शाळांना कायम विना अनुदान तत्त्वावर
परवानगी व नाहरकत प्रमाणपत्र देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.

शासन निर्णय क्र. नाहप्र २००९/(६६३/०९)/माशि-१

दिनांकः- २० जून, २०१२

संदर्भ : १) शासन निर्णय क्र.नाहप्र२००९/(६६३/०९)/माशि-१, दिनांक ७ ऑगष्ट २००९

२) शासन शुद्धीपत्रक क्र. नाहप्र२००९/(६६३/०९)/माशि-१, दिनांक २९ एप्रिल २०१०

**प्रस्तावना:** सीबीएसई (Central Board of Secondary Education), आयसीएसई (Indian Council of Secondary Education), आयबी (International Baccalaureate), आयजीसीएसई (International General Certificate of Secondary Education), सीआयई (Cambridge International Examination) इत्यादि देशातील तसेच विदेशातील शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होऊ इच्छिणाऱ्या इंग्रजी माध्यमांच्या कायम विना अनुदान तत्त्वावर शाळांना नाहरकत प्रमाणपत्र देण्यासंदर्भात संदर्भाधीन दिनांक ७ ऑगष्ट, २००९ आणि दिनांक २९ एप्रिल २०१० अन्वये आदेश निर्गमित केलेले आहेत. या दोन्ही शासन निर्णयातील तरतूदींच्या संदर्भात मा.उच्च न्यायालयात याचिका क्र. २१५७/२०१० दाखल करण्यात

आली होती. सदर याचिकेच्या संदर्भात मा.उच्च न्यायालयाने उक्त शासन निर्णयांना अंतरिम स्थगिती दिलेली आहे.

२. केंद्र सरकारने सन २००२ च्या ८६ व्या संविधान विशोधन अधिनियमान्वये भारतीय संविधानातील अनुच्छेद २१ (अे) मध्ये प्राथमिक शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराचा समावेश केला आहे. त्यानुसार सहा ते चौदा वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा अधिनियम, Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 (No.35, 2009), केंद्र शासनाने पारित करुन तो भारत सरकारच्या दिनांक २७.८.२००९ च्या राजपत्रात प्रसिध्द केला आहे. तसेच, भारत सरकारच्या दिनांक १६.२.२०१० च्या राजपत्रात सदर अधिनियम दिनांक १.४.२०१० पासून संपूर्ण भारतात (जम्मू व काश्मिर वगळता) लागू केला असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे यापुढे राज्यात सर्व शाळांना या अधिनियमात करण्यात आलेल्या तरतूदी तसेच सदर अधिनियमाच्या अनुषंगाने राज्य शासनाने दिनांक ११ ऑक्टोबर, २०११ आणि २४ मे २०१२ च्या राजपत्राव्दारे नियम व आदेश प्रसिध्द केले आहेत. त्याचे पालन करणे शाळांना अनिवार्य आहे.

३. राज्यात सीबीएसई/आयसीएसई/आयबी/आयजीसीएसई/सीआयई इत्यादि देशातील व विदेशातील शिक्षण मंडळांच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होऊ इच्छिणा-या कायम विना अनुदान तत्त्वावरील इंग्रजी माध्यमांच्या शाळांना यापुर्वी ना हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) देण्यात येत होते. बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा अधिनियम २००९ व त्या अंतर्गत राज्य शासनाने केलेल्या नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टिने उक्त शाळांच्या बाबतीत सर्वंकष धोरण निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. शैक्षणिक संस्थांनी सदर शाळा सुरु करण्याकरिता राज्य शासनास अर्ज केल्यानंतर या शाळांना हेतूपत्र (Letter of Intent), परवानगी (Permission), मान्यता (Recognition) व नाहरकत प्रमाणपत्र (NOC)

देण्यासाठी शासन उक्त प्रकरणी मा.उच्च न्यायालयाचे जे आदेश होतील त्याच्या अधीन राहून पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

## शासन निर्णय :

सीबीएसई (Central Board of Secondary Education), आयसीएसई (Indian Council of Secondary Education), आयबी (International Baccalaureate), आयजीसीएसई (International General Certificate of Secondary Education), सीआयई (Cambridge International Examination) इत्यादि देशातील तसेच विदेशातील शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होऊ इच्छिणाऱ्या इंग्रजी माध्यमांच्या कायम विना अनुदान तत्त्वावरील शाळांना हेतूपत्र, परवानगी, मान्यता व नाहरकत प्रमाणपत्र देण्यासाठी यापुढे खालीलप्रमाणे कार्यपध्दती आणि अटी व शर्ती निश्चित करण्यात येत आहेत.

१) **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे नियम सर्व शाळांना लागू असणे-**

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ मधील कलम-१८ व १९ आणि सदर अधिनियमाची अनुसूची त्याचबरोबर राज्य शासनाने राजपत्राव्दारे सदर अधिनियमाखाली विहित केलेले नियम व आदेश राज्यातील सर्व शाळांबरोबर सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई, सीआयई इत्यादि देशातील व विदेशातील शिक्षण मंडळाचा अभ्यासक्रम राबवू इच्छिणा-या सर्व शाळांना लागू राहतील.

(२) **शाळा परवानगीसाठी करावयाचा अर्ज-**

शाळा सुरु करण्याच्या प्रयोजनार्थ संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २१) (Society Registration Act, 1860) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० (१९५०चा मुंबई २४) (Bombay Public Trust Act, 1950) अन्वये नोंदणी झालेल्या

संस्था शाळा सुरु करण्यासंबंधी विहित नमुन्यात **परिशिष्ट - अ** नुसार शासनाकडे थेट अर्ज करु शकतील. अर्जासोबत सादर करावयाचे अभिलेख/कागदपत्रे याची यादी **परिशिष्ट-ब** मध्ये देण्यात आली आहे.

(३) **संस्थेने शाळा परवानगीसाठी अर्ज केल्यानंतर शाळा सुरु करण्यासाठी विहित अटी व शर्तींची पूर्तता करण्यासाठी हेतूपत्र-**

संस्था विहित प्रपत्रात विहित केलेल्या आवश्यक अभिलेख/कागदपत्रासह वरील २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शासनाकडे थेट अर्ज करील. सदर अर्ज सादर करताना इतर अभिलेखांच्या पूर्ततेसह संस्थेच्या स्वत:च्या नावावर बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अनुसार किमान आवश्यक शाळेची इमारत व भौतिक सुविधा निर्माण करण्यासाठी आवश्यक जागा तसेच शाळा ज्या मंडळाशी संलग्नित होणार आहे त्या मंडळाने विहित केलेली जागा असणे बंधनकारक राहील. जर संस्थेच्या स्वत:च्या नावावर अशी जागा नसेल. तथापि, ज्या संस्थेच्या नावावर नोंदणीकृत भाडेपट्टयाने (Registered Lease) किमान ३३ वर्षांसाठी उक्त जागा उपलब्ध असेल ती संस्था अर्ज करण्यासाठी पात्र राहील. त्याचबरोबर अर्ज सादर करताना अशा संस्थांच्या नावे किमान रु.१०,००,००० (रुपये दहा लक्ष) एवढी रक्कम मुदतठेवीच्या स्वरुपात असणे बंधनकारक राहील. शासनाकडे थेट प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन राज्य शासन अशा संस्थांना मागणीच्या ठिकाणी सुरुवातीस शाळा सुरु करण्यासाठी विहित अटी व शर्तींची पूर्तता करण्याकरिता हेतुपत्र (**Letter Of Intent**) देईल.

सदर हेतूपत्र संस्थेने शाळा परवानगी प्राप्त करण्यापुर्वी विहित अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या दृष्टीने दिलेले असेल. त्यामुळे असे हेतुपत्र (**Letter Of Intent**) जरी संस्थेस देण्यात आले तरी संस्थेस शाळा परवानगीचे आदेश शासनाकडून प्राप्त झाल्याशिवाय शाळा सुरु करता येणार नाही.

(४) **शाळा परवानगीसाठी इमारत व भौतिक सुविधा निर्माण करणे-**

संस्थांना ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यासंबंधी हेतुपत्र (**Letter Of Intent**) देण्यात आले आहे, त्या ठिकाणी संबंधित संस्था जास्तीत जास्त १८ महिन्यांच्या आत बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ अन्वये तसेच ज्या मंडळाशी शाळा संलग्नित होणार आहे त्या मंडळाने विहित केलेले निकष, शर्ती, अटी याच्या पूर्ततेसह शाळा इमारत व भौतिक सुविधा निर्माण करील. सदर हेतूपत्रानुसार १८ महिन्यात उक्त सुविधांची पूर्तता करुन शाळा परवानगीसाठी विभागीय शिक्षण उपसंचालकांकडे अर्ज सादर न केल्यास हेतूपत्र आपोआप रद्द होईल. तसेच हेतूपत्राला मुदतवाढ देता येणार नाही.

(५) **शाळा परवानगीसाठी विहित अटी व शर्तींची पूर्तता करुन चलनासह विभागीय शिक्षण उपसंचालकांकडे शैक्षणिक संस्थांनी अर्ज सादर करणे-**

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ अन्वये तसेच ज्या मंडळाशी शाळा संलग्नित होणार आहे त्या मंडळाने विहित केलेले निकष, शर्ती, अटी यांच्या पूर्ततेसह शाळा इमारत व भौतिक सुविधा निर्माण करुन शाळा परवानगीसाठी संबंधित संस्था (नोंदणी डाकेने) **परिशिष्ट क** मध्ये दिलेल्या नमुन्यामध्ये विभागीय शिक्षण उपसंचालकाकडे अर्ज सादर करील.

सदर अर्जासोबत **रु.२५,०००/-** इतके ना परतावा तपासणी शुल्क शासकीय कोषागारात ०२०२ शिक्षण क्रीडा, कला व संस्कृती, ०१ सर्वसाधारण शिक्षण, १०१ प्राथमिक शिक्षण, (०१) शिक्षण शुल्क व इतर शुल्क, (०१) (०२) शिक्षण शुल्क व इतर शुल्क, (०२०२०२१३ या लेखाशीर्षाखाली जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांच्या साक्षांकनाने भरुन चलनाची मूळ प्रत सादर करील.

(६) **छाननी व प्रत्यक्ष पहाणी करुन समितीने अहवाल सादर करणे-**

विभागीय शिक्षण उपसंचालकाकडे वरील क्रमांक ५ अनुसार शैक्षणिक संस्थांकडून अर्ज प्राप्त झाल्यानंतर विभागीय शिक्षण उपसंचालक त्यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडून अर्जाची छाननी करुन व प्रत्यक्ष तपासणी करुन समितीचा वस्तुनिष्ठ अहवाल दोन महिन्यांच्या आत शासनास सादर करील. समितीची रचना व कार्यपध्दती **परिशिष्ट-ड** मध्ये देण्यात आली आहे.

(७) **शाळा परवानगी-**

विभागीय शिक्षण उपसंचालकांकडून शाळा परवानगी अर्जाच्या अनुषंगाने समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित संस्था विहित अटी व शर्तीचे पालन करीत असल्यास शासन संबंधित संस्थेस प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देईल.

संबंधित संस्थेची मागणी असल्यास आणि त्यानुषंगाने संबंधित संस्था विहित अटी व शर्तींची पूर्तता करीत असल्यास अशा संस्थांना इयत्ता पहिली ते आठवी किंवा इयत्ता पहिली ते दहावी किंवा इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या शाळेस परवानगी देईल.

(८) **त्रुटी पूर्ततेसाठी संधी व त्यानंतरच शाळा परवानगी-**

समितीच्या अहवालानुसार संबंधित संस्था शाळा सुरु करण्याच्या प्रयोजनार्थ विहित अटी व शर्तींची पूर्तता करीत नसल्यास, ज्या बाबींची पूर्तता झालेली नाही त्याबाबतची माहिती संबंधित संस्थेला कळविण्यात येवून विहित कालमर्यादेत त्याची पूर्तता करण्यास निर्दिष्ट केले जाईल. निर्दिष्ट कालावधीत संबंधित संस्थेने पूर्तता अहवाल सादर केल्यास त्याबाबतची शहानिशा करुन समिती शासनास आपला अहवाल सादर करील. समितीच्या अहवालानुसार संस्था विहित शर्ती व अटींचे पालन करीत असल्यास शासन संबंधित संस्थेस शाळा सुरु करण्यास परवानगी देईल. संस्थेस शाळा सुरु करण्यास शासनाकडून परवानगी मिळाल्याशिवाय संस्था प्रत्यक्षात शाळा सुरु करणार नाही.

(९) **विहित कालावधीत शाळा सुरु न केल्यास शाळेची परवानगी आपोआप रद्द-**

शाळेस शासनाकडून परवानगी दिल्यानंतर संस्था जास्तीत जास्त १८ महिन्याच्या आत परवानगी दिलेल्या ठिकाणी शाळा सुरु करील व त्याबाबतचा अहवाल जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांना तसेच संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांना सादर करील.

शासनाने संस्थेस ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यास परवानगी दिली आहे त्या ठिकाणी १८ महिन्याच्या आत शाळा सुरु न केल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द होईल.

१०) **शाळांना मान्यता (Recognition) देणे-**

शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९ मधील कलम १८ च्या अनुषंगाने नियम-२०११ मधील नियम-११ मध्ये विहित केलेल्या अटी व शर्ती पूर्ण करीत असल्यास जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/ शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई अशा शाळांना मान्यता (Recognition) देईल.

११) **शाळेची परवानगी काढून घेणे-**

शाळेस परवानगी व मान्यता देण्यासाठी विहित केलेल्या अटी व शर्तीचे पालन करण्याचे शाळेने थांबविले आहे, असे निदर्शनास आल्यास अशा शाळांची मान्यता महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम-२०११ मधील नियम- १२ अनुसार काढून घेण्यात येईल.

१२) **मंडळ संलग्नतेसाठी नवीन शाळेस ना हरकर प्रमाणपत्र देणे-**

जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) / शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/ शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांनी शाळेस मान्यता दिल्यानंतर मान्यतापत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना हरकत प्रमाणपत्रासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन संबंधित शाळा विहित

निकष, अटी व शर्तींची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना हरकत प्रमाणपत्र देईल.

१३) **मान्यताप्राप्त विद्यमान शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना हरकत प्रमाणपत्र देणे-**

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९ अनुसार मान्यताप्राप्त (Recognised) चालू असलेली शाळा, सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई, सीआयई इत्यादी देशातील व विदेशातील मंडळाशी संलग्न होऊ इच्छित असेल तर संबंधित संस्था परिशिष्ट-ब येथील कागदपत्रे व मान्यतापत्रासह परिशिष्ट-अ मध्ये शासनाकडे थेट अर्ज करील. संबंधित शाळा निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मागणी केलेल्या मंडळ संलग्नतेसाठी ना हरकत प्रमाणपत्र देईल.

१४) **राज्यात स्थापित सर्व शाळांना शासनाचे सर्व अधिनियम, नियम, आदेश लागू असणे-**

राज्यात परवानगी मिळालेल्या सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई, सीआयई इत्यादि देशातील तसेच विदेशातील शिक्षण मंडळांच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित सर्व प्रकारच्या शाळांना राज्य शासन शिक्षण विषयक अधिनियम, नियम, आदेश व वेळोवेळी जे धोरण लागू करेल आणि निर्धारित करेल ते लागू राहील.

१५) **इयत्ता पहिली ते पाचवीसाठी अनिवार्य अभ्यासक्रम-**

राज्यात परवानगी दिलेल्या सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई, सीआयई इत्यादि देशातील व विदेशातील मंडळांच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांना इयत्ता पहिली ते पाचवी साठी राज्य शासनाचा किंवा संबंधित मंडळाचा अभ्यासक्रम अनिवार्य राहील.

१६) **मराठी भाषा हा विषय शिकविणे-**

उक्त मंडळाच्या सर्व शाळांमध्ये इयत्ता आठवी पर्यंत मराठी भाषा हा विषय शिकविण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्राच्या शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtragov.in) उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. 201206200859120500 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(र. प्र. आटे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

२) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

३) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

४) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.

५) संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

६) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.

७) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक

८) सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषदा सर्व.

९) सर्व शिक्षण निरीक्षक (पश्चिम/उत्तर/दक्षिण), बृहन्मुंबई

१०) मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव

११) मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव

१२) मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव

१३) मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव

१४) मा. अपर मुख्य सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा) यांचे स्वीय सहायक

१५) माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई, सदर शासन निर्णयातील

तरतूदींना व्यापक प्रसिद्धी देण्याच्या विनंतीसह

१६) शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील सर्व सहसचिव / उपसचिव,

१७) निवडनस्ती, माशि - १

## परिशिष्ट - अ

**शासन निर्णय क्र.नाहप्र २००९/(६६३/०९)/माशि-१, दिनांक:- २७ जून, २०१२ अनुसार शाळा सुरु करण्यासाठी व मान्यताप्राप्त शाळांना ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना**

| अ.क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १ | ज्या संस्थेला प्रस्तावित शाळा सुरु करावयाची आहे त्या संस्थेचे नांव व पत्ता | |
| २ | प्रस्तावित शाळेचे नांव | |
| ३ | सुरु करावयाचे वर्ग | |
| ४ | संस्था नोंदणीकृत आहे काय ? | |
| | असल्यास,<br>अ) सोसायटी नोंदणी अधिनियम १८६० (१८६० चा २१) नुसार केलेला नोंदणी क्रमांक | |
| | ब) मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० (१९५० चा मुंबई २४) | |
| | क) संस्थेच्या व्यवस्थापन समिती सदस्यांची माहिती. | |
| | ड) संस्थेमध्ये वाद आहेत काय ? | |
| | इ) संस्थेच्या व्यवस्थापन समिती सदस्यांच्या नावातील बदलासंबंधी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाकडे बदल अहवाल निर्णया अभावी प्रलंबित आहेत काय ? | |
| | असल्यास, त्याचा तपशील | |
| ५ | संस्था दुसऱ्या मान्यताप्राप्त प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, अध्यापक विद्यालये, महाविद्यालये इत्यादि चालवित आहे काय ? | |
| | असल्यास, त्यांची नावे व पत्ते. | |
| ६ | ज्या क्षेत्रात प्रस्तावित शाळा सुरु करावयाची आहे त्या ठिकाणाचे/गावाचे नांव, तालुका, जिल्हा इत्यादि. | |
| ७ | मागील जनगणनेनुसार प्रस्तावित ठिकाणाची/ गावची लोकसंख्या. | |

| | | |
|---|---|---|
| ८ | आजूबाजूच्या परिसरातील/गावातील विद्यार्थी शाळेत येण्याची शक्यता आहे त्या ठिकाणाची/ गावांची नांवे व मागील जनगणनेनुसार त्यांची लोकसंख्या | |
| ९ | प्रस्तावित शाळेसाठी उपलब्ध असलेली जागा व त्याचा तपशील | |
| | अ) जागा संस्थेच्या मालकीची आहे काय ?<br>असल्यास, क्षेत्र (एकर मध्ये) | |
| | ब) जागा भाडेकरारावर (लिज) असल्यास<br>किती वर्षासाठी ?<br>क्षेत्र (एकर मध्ये) | |
| १० | संस्थेकडे असलेल्या निधीचा तपशील. | |
| | अ) बँकेचे नांव व खाते क्रमांक<br>ब) खात्यावरील शिल्लक रक्कम रुपये<br>क) ठेव स्वरुपातील निधी (बँक/पोस्ट)<br>ड) इतर निधी | |

ठिकाण :

दिनांक :

स्वाक्षरी

संस्था सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी

## परिशिष्ट - ब

**शासन निर्णय क्र.नाहप्र २००९/(६६३/०९)/माशि-१, दिनांक:-२० जून, २०१२** अनुसार शाळा परवानगी / नाहरकत प्रमाणपत्र देण्यासाठीच्या अर्जासोबत सादर करावयाची अभिलेख/कागदपत्रे.

१) संस्था नोंदणी प्रमाणपत्र - सोसायटी नोंदणी अधिनियम १८६०/ मुंबई विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५०

२) संस्थेची घटना.

३) अद्ययावत पीटीआर उतारा (शेडयूल १ ची प्रत)

४) संस्थेच्या व्यवस्थापन समितीमध्ये वाद नसलेबाबतचे प्रतिज्ञापत्र.

५) संस्थेच्याबाबतीत न्याय प्रविष्ठ प्रकरण नसलेबाबत प्रतिज्ञापत्र.

६) प्रस्तावित शाळेसाठी उपलब्ध असलेली जमीनीसंबंधीचे अभिलेख.

अ) जमीन संस्थेच्या मालकीची असल्याबाबतचा ७/१२ चा अद्ययावत उतारा.

ब) इमारतीसंबंधी ८ अ/ इंडेक्स II चा उतारा.

क) जमीन/जागा भाडे करारावर (लीज) असल्यास भाडेकराराची प्रत.

७) संस्थेच्या आर्थिक क्षमतेबाबतची कागदपत्रे.

८) संस्थेचा मागील तीन वर्षाचा लेखा परिक्षित ताळेबंद.

## परिशिष्ट - क

शासन निर्णय क्र.नाहप्र २००९/(६६३/०९)/माशि-१, दिनांकः- २० जून, २०१२ अनुसार

शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत करावयाच्या अर्जाचा नमुना

| अ.क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १ | ज्या संस्थेला प्रस्तावित शाळा सुरु करावयाची आहे त्या संस्थेचे नांव व पत्ता | |
| २ | प्रस्तावित शाळेचे नांव | |
| ३ | सुरु करावयाचे वर्ग | |
| ४ | संस्था नोंदणीकृत आहे काय ? | |
| | असल्यास,<br>अ) सोसायटी नोंदणी अधिनियम १८६० (१८६० चा २१) नुसार केलेला नोंदणी क्रमांक | |
| | ब) मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० (१९५० चा मुंबई २४) | |
| | क) संस्थेच्या व्यवस्थापन समिती सदस्यांची माहिती. | |
| | ड) संस्थेमध्ये वाद आहेत काय ? | |
| | इ) संस्थेच्या व्यवस्थापन समिती सदस्यांच्या नावातील बदलासंबंधी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाकडे बदल अहवाल निर्णया अभावी प्रलंबित आहेत काय ? | |
| | असल्यास, त्याचा तपशील | |
| ५ | संस्था दुसऱ्या मान्यताप्राप्त प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, अध्यापक विद्यालये, महाविद्यालये इत्यादि चालवित आहे काय ? | |
| | असल्यास, त्यांची नावे व पत्ते. | |
| ६ | ज्या क्षेत्रात प्रस्तावित शाळा सुरु करावयाची आहे त्या ठिकाणाचे/गावाचे नांव, तालुका, जिल्हा इत्यादि. | |
| ७ | मागील जनगणनेनुसार प्रस्तावित ठिकाणाची/ गावची लोकसंख्या. | |
| ८ | आजूबाजूच्या परिसरातील/गावातील विद्यार्थी शाळेत येण्याची शक्यता आहे त्या ठिकाणाची/ गावांची नांवे व | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मागील जनगणनेनुसार त्यांची लोकसंख्या | | | | | |
| ९ | परिसरातील/गावातील प्राथमिक शाळांची ( इ. १ ते ८ वी) माहिती | | | | | |
| | शाळेचे नांव व पत्ता | माध्यम | इयत्ता | | विद्यार्थी संख्या | प्रस्तावित शाळे पासूनचे अंतर |
| १० | परिसरातील/गावातील माध्यमिक शाळांची (इ. ९ ते १० वी) माहिती | | | | | |
| | शाळेचे नांव व पत्ता | माध्यम | | इयत्ता | विद्यार्थी संख्या | प्रस्तावित शाळे पासूनचे अंतर |
| ११ | परिसरातील/गावातील उच्च माध्यमिक शाळांची ( इ. ११ व १२ वी) माहिती | | | | | |
| | शाळेचे नांव व पत्ता | शाखा | माध्यम | इयत्ता | विद्यार्थी संख्या | प्रस्तावित शाळे पासूनचे अंतर |
| १२ | प्रस्तावित शाळेसाठी उपलब्ध असलेली जागा व त्याचा तपशील | | | | | |
| | अ) जागा संस्थेच्या मालकीची आहे काय ? असल्यास, क्षेत्र (एकर मध्ये) | | | | | |
| | ब) जागा भाडेकरारावर (लिज) असल्यास किती वर्षासाठी ?<br>क्षेत्र (एकर मध्ये) | | | | | |
| | क) प्रस्तावित शाळेच्या इमारतीचा तपशील | | | | खोल्यांची संख्या | आकार क्षेत्र (चौ.फू. मध्ये) |
| | १) मुख्याध्यापक कक्ष<br>२) शिक्षक कक्ष<br>३) वर्ग खोल्या<br>४) संगणक प्रयोगशाळा<br>५) ग्रंथालय<br>६) विज्ञान प्रयोगशाळा<br>७) चित्रकला दालन<br>८) कार्यालय कक्ष<br>९) मुलांसाठी कक्ष<br>१०) मुलींसाठी कक्ष | | | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | ११) बहुउद्देशीय सभागृह<br>१२) इतर खोल्या<br>१३) स्वच्छता गृह - मुतारी - मुले<br>- मुली<br>- कर्मचारी वृंद<br>संडास - मुले<br>- मुली<br>- कर्मचारी वृंद<br>१४) पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेचा तपशील<br>१५) अग्नीशमन व्यवस्थेचा तपशील | | |
| | ड) क्रीडांगण आहे काय ? असल्यास शाळेपासून अंतर व क्षेत्र (चौ. मी. मध्ये) संस्थेच्या मालकीचे आहे की भाड्याचे ? | | |
| | इ) खालील बाबींचा तपशील द्यावा. | | |
| | १) फर्निचर<br>२) शास्त्रीय उपकरणे<br>३) अध्ययन-अध्यापन साहित्य<br>४) शिक्षकांकरिता ग्रंथालय<br>५) विद्यार्थ्यांकरिता ग्रंथालय | | |
| | फ) शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची माहिती | | |

| अ.क्र. | शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्याचे नांव | शैक्षणिक अर्हता | व्यावसायिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| | | | | |

| | | |
|---|---|---|
| १३ | संस्थेकडे असलेल्या निधीचा तपशील. | |
| | अ) बँकेचे नांव व खाते क्रमांक<br>ब) खात्यावरील शिल्लक रक्कम रुपये<br>क) ठेव स्वरुपातील निधी (बँक/पोस्ट)<br>ड) इतर निधी | |
| १४ | मागील तीन वर्षांचे संस्थेचे लेखा परिक्षित ताळेबंद | |

ठिकाण :

दिनांक :

स्वाक्षरी

संस्था सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी

# परिशिष्ट -ड

**शासन निर्णय क्र.नाहप्र २००९/(६६३/०९)/माशि-१, दिनांक:- २७ जून, २०१२ अनुसार** शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यासाठीच्या तपासणी प्रयोजनार्थ नियुक्त समितीची रचना व कार्यपध्दती.

समितीची रचना-

| | | |
|---|---|---|
| १) | विभागीय शिक्षण उपसंचालक | अध्यक्ष |
| २) | संबंधित जि.शि.प्र.संस्थेचे प्राचार्य | सदस्य |
| ३) | संबंधित जिल्हा नवोदय विद्यालयाचे प्राचार्य | सदस्य |
| ४) | शिक्षण उपसंचालकांनी नामनिर्देशित केलेले सीबीएसई/ आयसीएसई संलग्नित शाळेचे एक प्राचार्य. | सदस्य |
| ५) | संबंधित जिल्हा शिक्षणाधिकारी (प्रा)/शिक्षण निरिक्षक, बृहन्मुंबई | सदस्य |

समितीची कार्यपध्दती -

१) शासनाकडून ज्या संस्थाना शाळा सुरु करण्यासाठी हेतुपत्र देण्यात आलेले आहे त्या संस्थांच्या प्रस्तावित शाळांची भेट देवून तपासणी समितीमार्फत केली जाईल.

२) समिती अशा संस्थांच्या शाळांना प्रत्यक्ष भेटी देऊन संस्थेने शाळा परवानगीसाठी केलेल्या अर्जातील माहितीची मूळ कागदपत्रांच्या आधारे शहानिशा करेल.

३) शाळा परवानगीसाठी विहित केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता केल्याची खात्री करुन वस्तुनिष्ठ माहितीच्या आधारे समिती संस्थेच्या प्रस्तावित शाळेसाठी योग्य ती शिफारस करेल.

४) विभागीय शिक्षण उपसंचालक तथा समिती अध्यक्ष या शिफारशीसह आपला अहवाल शासनाकडे सादर करतील.

५) अहवालावर समितीच्या सर्व पदाधिका-यांच्या स्वाक्ष-या असतील.

(१)

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक:हेतूप-२०१२/(४७/१२)/माशि-५
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
दिनांक:२९ ऑक्टोबर, २०१२

प्रति,
सचिव/अध्यक्ष,
जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ, पुणे,
स.नं.८०, पुणे-मुंबई बायपास हायवे,
ताथवडे, ता.मुळशी, जि.पुणे.
पिन नं.४११ ०३३.

विषय:- सी.बी.एस.ई. या मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलंग्नित होणा-या इंग्रजी माध्यमाच्या कायम विनाअनुदानीत तत्त्वावरील शाळेला हेतूपत्र देण्याबाबत.
**जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ, पुणे द्वारा संचालित ब्लॉसम पब्लीक स्कूल (न्यू), न-हे, ता.हवेली, जि.पुणे.**

संदर्भ :- १) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र.नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१, दिनांक २०.०६.२०१२.
२) आपला दिनांक १०.०७.२०१२ चा प्रस्ताव.

सी.बी.एस.ई. मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलंग्नित होणा-या कायम विनाअनुदानित तत्त्वावरील इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करण्यासाठी हेतूपत्र (Letter of Intent) प्राप्त होण्याकरीता शासनास **जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ, पुणे** या संस्थेचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

२. राज्यात सी.बी.एस.ई./आय.सी.एस.ई./आय.जी.सी.एस.ई./सी.आय.ई. इत्यादी देशातील व विदेशातील मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलंग्नित होणा-या कायम विनाअनुदानित तत्त्वावरील इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु करण्याकरीता राज्य शासनाकडे अर्ज केल्यानंतर सदर शाळांना हेतूपत्र (Letter of Intent), परवानगी (Permission), मान्यता (Recognition) व ना हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) देण्याबाबतची सविस्तर कार्यपध्दती संदर्भाधिन क्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आली आहे. त्याप्रमाणे शाळा सुरु करण्यापूर्वी विहित केलेल्या कार्यपध्दतीची पूर्तता करणे बंधणकारक राहणार आहे.

३. उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भाधिन क्रमांक २ अन्वये प्राप्त झालेल्या आपल्या अर्जाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, आपल्या अर्जात नमूद केलेल्या **स.नं.१२/२/२, मौ.न-हे, ता.हवेली, जि.पुणे** या ठिकाणी सी.बी.एस.ई. या मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलंग्नित कायम विनाअनुदान तत्त्वावर इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करण्याकरीता संदर्भाधिन क्रमांक १ च्या शासन निर्णयातील विहित केलेल्या खालील सर्व आठ अटी व शर्तीची पूर्तता होत असल्याने सदरहू **हेतूपत्र** देण्यात येत आहे.

१) संस्था नोंदणी प्रमाणपत्र

२) संस्थेची घटना

३) अद्ययावत पी.टी.आर.उतारा

४) संस्थेच्या व्यवस्थापन समितीमध्ये वाद नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र

५) संस्थेच्याबाबतीत न्यायप्रविष्ठ प्रकरण नसल्याबाबतचे प्रमाणपत्र

६) प्रस्तावित शाळेसाठी उपलब्ध असलेली जमिनीसंबंधीचे अभिलेख

७)संस्थेच्या आर्थिक क्षमतेबाबतची कागदपत्रे

८) संस्थेच्या मागील तीन वर्षाचा लेखापरिक्षित ताळेबंद

४. जरी हे हेतुपत्र संस्थेस देण्यात आले असले तरी शाळा परवानगीचे आदेश शासनाकडून प्राप्त झाल्याशिवाय प्रत्यक्षात शाळा सुरु करता येणार नाही.

**५. संस्थेला हेतूपत्राच्या आधारावर शाळा सुरु करता येणार नाही.**

**Society can not start the school on basis of Letter of Intent.**

**६. सी.बी.एस.ई./आय.सी.एस.ई./आय.बी./आय.जी.सी.एस.ई. या मंडळाच्या संलग्नतेसाठी हेतूपत्राचा वापर करता येणार नाही.**

**Letter of Intent cannot be used as N.O.C. For affilation with CBSE / ICSE / IB / IGCSE etc. Board**

**७. शाळेला सी.बी.एस.ई. / आय.सी.एस.ई./ आय.बी. / आय.जी.सी.एस.ई. या मंडळाकडून संलग्नता प्राप्त झाल्याशिवाय संस्थेला या मंडळाच्या नांवाचा उपयोग करता येणार नाही.**

**The name of CBSE/ICSE/IGCSE/IB etc. cannot be used by Society prior to affilation from concerned Board.**

८. सदर संस्थेस ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यासंबंधी हेतूपत्र देण्यात आले आहे त्याठिकाणी संबंधित संस्था जास्तीत जास्त १८ महिन्यांच्या आत बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ तसेच ज्या मंडळाशी शाळा संलग्नित होणार आहे त्या मंडळाने विहित केलेले निकष, शर्ती, अटी यांच्या पूर्ततेसह शाळा इमारत व भौतिक सुधारणा निर्माण करणे बंधनकारक राहील. सदर हेतूपत्रानुसार १८ महिन्यात उक्त सुविधांची पूर्तता करुन शाळा परवानगी साठी विभागीय शिक्षण उपसंचालकांकडे प्रस्ताव सादर न केल्यास हेतूपत्र आपोआप रद्द होईल. तसेच हेतूपत्रास मुदतवाढ देता येणार नाही.

**(विनोद बोंदरे)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,
१) शिक्षण संचालक (प्राथमिक / माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे.
४) निवड नस्ती, माशि-५, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक:मान्यता-२०१३/(५१/१३)/माशि-१
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
दिनांक :२३ मे, २०१३

**प्रति,**
**अध्यक्ष / सचिव,**
जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ,
पुणे-मुंबई बायपास हायवे,
ताथवडे, ता. मुळशी,
**जि.पुणे.**

विषय :-सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात सी.बी.एस.ई.या अभ्यासक्रमाशी संलग्नित होऊ इच्छिणा-या कायम विनाअनुदानित तत्त्वावर इंग्रजी शाळांना परवानगी देणेबाबत....
**जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ, पुणे-मुंबई बायपास हायवे, ताथवडे, ता. मुळशी, जि. पुणे द्वारा संचालित ब्लॉसम पब्लिक स्कूल (न्यू), मौजे न-हे, ता. हवेली, जि. पुणे.**

संदर्भ :- १) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र.नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१, दिनांक २०.०६.२०१२.
२) शासन पत्र क्रमांक हेतूप -२०१२ /(४७/१२)/माशि - १ दिनांक २९/१०/२०१२ चे हेतूपत्र.
३) शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे दिनांक २०/०२/२०१३ चे पत्र.

संदर्भ क्रमांक १ अन्वये राज्यात सी.बी.एस.ई. / आय.सी.एस.ई./ आय.जी.सी.एस.ई./ सी.आय.ई. या अभ्यासक्रमाशी संलग्नित होऊ इच्छिणा-या कायम विनाअनुदानित तत्त्वावर इंग्रजी माध्यमांच्या शाळा सुरु करण्याकरीता राज्य शासनाकडे अर्ज केल्या नंतर सदर शाळांना हेतूपत्र (Letter Of Intent), परवानगी (Permission), मान्यता (Recognition) व ना हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) देण्याबाबतची सविस्तर कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. त्याप्रमाणे शाळा सुरु करण्यापूर्वी विहित केलेल्या कार्यपध्दतीची पुर्तता करणे बंधणकारक राहणार आहे.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भाधिन क्रमांक ३ अन्वये प्राप्त झालेल्या पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, आपल्या अर्जात नमूद केलेल्या **मौजे न-हे, ता. हवेली, जि. पुणे** या ठिकाणी **सी.बी.एस.ई.** या अभ्यासक्रमाशी संलग्नित होऊ इच्छिणा-या **इयत्ता १ ते १२ वी** पर्यंतच्या कायम विनाअनुदानित तत्त्वावर इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करण्यासाठी माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबींची तसेच खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधिन राहून शासन **परवानगी** देत आहे.

१) सदर शाळेला भविष्यात कोणतेही अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

२) सदर शाळेस शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशांचे, माध्यमिक शाळा संहिता, महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

३) सदर संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारण असणे आवश्यक आहे.

४) संस्थेने सदर शाळेला शैक्षणिक दृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन द्यावी.

५) संस्थेने सदर शाळेसाठी स्वतंत्र क्रिडांगणाची सोय उपलब्ध करुन द्यावी.

६) संस्थेने सदर शाळेत मुख्याध्यापक पदी महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवा शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम क्र.३(१) (ब) नुसार पात्र व्यक्तिंची नियुक्ती करावी.

७) संस्थेने सदर शाळेत पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग नियुक्त करावा.

८) संस्थेने सदर शाळेत शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या नियुक्त्या करताना बिंदु नामावलीनुसार करण्यात याव्यात.

९) संस्थेने सदर शाळेत सर्व साहित्यानिशी स्वतंत्र प्रयोगशाळा उपलब्ध करुन द्यावी.

१०) संस्थेने सदर शाळेत स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन द्यावी.

११) संस्थेने सदर शाळेत विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर, क्रिडा साहित्य, कार्यानुभव साहित्य व इतर शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन द्यावे.

१२) संस्थेने शाळेत अद्ययावत संगणक प्रयोगशाळा निर्माण करावी.

१३) मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छता गृहाची सोय असावी.

१४) संस्थेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील सर्व अटी व शर्तीची पूर्तता करणे आवश्यक राहील.

१५) शाळेस परवानगी व मान्यता देण्यासाठी विहित केलेल्या अटी व शर्तीचे पालन करण्याचे शाळेने थांबिवले आहे असे निदर्शनास आल्यास शाळेची मान्यता महारष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम १२ नुसार काढून घेण्यात येईल.

१६) शाळेस शासनाकडून परवानगी दिल्यानंतर संस्था जास्तीत जास्त १८ महिन्याच्या आत परवानगी दिलेल्या ठिकाणी शाळा सुरु करेल.

१७) शासनाने संस्थेस ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यास परवानगी दिली आहे. त्याठिकाणी १८ महिन्याच्या आत शाळा सुरु न केल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द होईल.

१८) शाळा बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९ मधील कलम १८ च्या अनुषंगाने नियम २०११ मधील नियम ११ मध्ये विहित केलेल्या अटी व शर्ती पूर्ण केल्यावर **जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), पुणे** यांचेकडून शाळेला मान्यता घेणे आवश्यक राहील.

१९) **जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), पुणे** यांनी शाळेस मान्यता दिल्यावर संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नतेसाठी ना हरकत प्रमाणपत्रासाठी शासनाकडे अर्ज करेल.

सु.न.जोशी.

**(सु.न.जोशी)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

शिक्षण संचालक (प्राथमिक / माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे.
निवड नस्ती, माशि-१, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.